# 'एनएसएस'ची फौज मैदानात

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती | २८ हजार स्वयंसेवक प्रशासनाच्या मदतीला

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोरोना रोखण्यासाठी शिवाजी विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजनेतील सुमारे २८ हजार स्वयंसेवक नागरिकांच्या सेवेसाठी आणि प्रशासनाच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदतीसाठी तत्पर आहेत. ही कामे करत असताना त्यांनी नागरिकांबरोबरच स्वतःच्या आरोग्याचीही दक्षता घ्यावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले आहे.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी म्हटले आहे की, कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता शिवाजी विद्यापीठाच्या वसतिगृहात १ हजार बेडचे आयसोलेशन केंद्र तात्पुरत्या स्वरूपात सुरू केले



जात आहे. सध्याच्या संकट काळात शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांमधील व राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना यांच्या स्वयंसेवक व स्वयंसेविकांवर कोरोनाविरुद्धच्या लढाईत सहभागी होण्याची मोठी जबाबदारी आली आहे. या युद्धात विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक पूर्ण तयारीनिशी उतरले असून, सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृतीचे कार्य प्रभावीपणे करत आहेत, याचा आपल्याला अभिमान आहे.

एनएसएसचे सुमारे २८ हजार स्वयंसेवक फेसबुक, व्हॉटस् अप यांसह इतर सोशल मीडियाचा वापर करत ५० लाखांहून अधिक लोकांपर्यंत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पद्धतीने पोहोचत आहेत. लोकांना सॅनिटायझर, मास्क यांचे वितरण, किराणा, भाजीपाला, औषधे व इतर जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा आदी महत्त्वाची कामे स्वयंसेवक करत आहेत.

### स्वयंसेवकांनी नोंदणी करावी

सातारा, सांगली आणि कोल्हापूर या तिन्ही जिल्ह्यांत प्रशासनाच्या मदतीसाठी हेल्पलाईनमध्ये काम करण्यासाठी इच्छुक स्वयंसेवकांची पालकांच्या परवानगीने नोंदणी सुरू आहे. यासाठी स्वतंत्र गुगल रजिस्ट्रेशन फॉर्म तयार केला आहे. त्याद्वारे स्वयंसेवकांनी नोंदणी करावी आणि या राष्ट्रीय आपत्तीच्या क्षणी आपला मोलाचा सहभाग नोंदवावा, असे आवाहन कुलगुरूंनी केले आहे.

# डिजिटल व्यवहारांसाठी शिक्षकांनी प्रबोधन करावे

## कुलगुरू डॉ. शिंदे; सायबर सिक्युरिटी ऑनलाईन कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन करण्यात आल्याने नागरिकांना डिजिटल साधनांचा आधार घ्यावा लागत आहे. ऑनलाईन व्यवहारांत वाढ झाल्याने सायबर व फिशिंग हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे. यामुळे डिजिटल व्यवहारांबाबत समस्या निर्माण झाल्या आहेत. अशा परिस्थितीत शिक्षकांनी मिळालेले ज्ञान समाजाच्या सर्व घटकांपर्यंत पोहोचवावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या पंडित मदनमोहन मालवीय शिक्षक व शिक्षणविषयक राष्ट्रीय अभियानांतर्गत शिवाजी विद्यापीठात कार्यरत सायबर सिक्युरिटी व डाटा सायन्सेस फॅकल्टी डेव्हलपमेंट केंद्रातर्फे शुक्रवारी सायबर सिक्युरिटीविषयक एकदिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळा झाली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती.



**कोल्हापूर : ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळेत बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.**

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, कोरोनाच्या उद्रेकाशी संपूर्ण जग झुंज देत आहे. अशावेळी प्रत्येक घटकापुढे मोठे आव्हान आहे. विविध कारणांसाठी नागरिकांना डिजिटल पद्धतीचा वापर करणे गरजेचे होऊन बसले आहे. नागरिकांनी डिजिटल व्यवहार बाळगताना सावधानता बाळगणे आवश्यक आहे.

या कार्यशाळेत विविध राज्यांतील सुमारे ६१ हून अधिक प्रतिनिधी ऑनलाईन सहभागी झाले होते. प्रा. डॉ. आर. के. कामत यांनी कार्यशाळा आयोजनामागील भूमिका मांडली.

तरुण भारत

# ‘कोरोना’विरोधात एनएसएसची फौज मदतीला

## डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती : कोल्हापूर, सांगली, सातारा येथील २८ हजार स्वयंसेवक तयार

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनाच्या प्रादुर्भावाला रोखण्यासाठी शिवाजी विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजनेतील सुमारे २८ हजार स्वयंसेवक नागरिकांच्या सेवेसाठी आणि प्रशासनाच्या मदतीसाठी तयार आहेत. मदतकार्य करत असताना स्वयंसेवकांनी नागरिकांबरोबरच स्वत:च्या आरोग्याचीही दक्षता घ्यावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शुक्रवारी केले.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, समाजावरील प्रत्येक संकटाच्या काळात शिवाजी विद्यापीठ पूर्ण क्षमतेने पुढाकार घेऊन त्यावर मात करण्यासाठी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून काम करीत असते. कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता शिवाजी विद्यापीठाच्या वसतिगृहामध्ये एक हजार बेडचे आयसोलेशन केंद्र तात्पुरत्या स्वरूपात उभारण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.



सध्याच्या संकट काळात शिवाजी विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांमधील व राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना यांच्या स्वयंसेवक व स्वयंसेविकांवर कोरोनाविरुद्धच्या लढाईत सहभागी होण्याची मोठी जबाबदारी आहे. या युद्धात विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक पूर्ण तयारीनिशी उतरले आहेत. एनएसएसचे सुमारे २८,००० स्वयंसेवक फेसबुक, व्हॉट्सअप यांसह इतर सोशल मीडियाचा वापर करत




### सहभाग नोंदवा...

सातारा, सांगली आणि कोल्हापूर या तिन्ही जिल्ह्यांत प्रशासनाच्या मदतीसाठी हेल्पलाईनमध्ये काम करण्यासाठी इच्छुक स्वयंसेवकांची पालकांच्या परवानगीने नोंदणी सुरू आहे. यासाठी स्वतंत्र गुगल रजिस्ट्रेशन फॉर्म तयार केला आहे. त्याद्वारे स्वयंसेवकांनी नोंदणी करावी आणि या राष्ट्रीय आपत्तीच्या क्षणी आपला मोलाचा सहभाग नोंदवावा, असे आवाहन कुलगुरूंनी केले आहे.

५० लाखांहून अधिक लोकांपर्यंत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पद्धतीने पोहोचत आहेत. अगदी नागरिकांच्या कौटुंबिक अडीअडचणींची माहिती घेऊन अनेकवेळा स्वत: तर काहीवेळा प्रशासनाच्या माध्यमातून त्यांना तत्परतेने मदत करत आहेत.गरजू, फिरस्ते, गावोगावचे असहाय ज्येष्ठ नागरिक, अनाथ, दिव्यांग इत्यादी लोकांच्या मदतीला जात आहेत.लोकांना सॅनिटायझर्स, मास्क यांचे वितरण, किराणा, भाजीपाला, औषधे व इतर जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा आदी महत्वाची कामे स्वयंसेवक करत आहेत.

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे आपण सारेच त्रस्त आहोत. सद्यस्थिती पाहता लॉकडाऊनच्या कालावधीतसुद्धा कोरोनाबाधित रुग्णांची व बळींची संख्या वाढली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य व जिल्हा प्रशासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले सोशल डिस्टन्सिंगसह मास्क वापरणे, साबणाने हात धुणे आदी दक्षता आपण व्यक्तिगत व कौटुंबिक स्तरावर घेणे अत्यावश्यक असल्याचेही कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले.

# कुटुंबासोबत आनंदाचे क्षण...

म.टा. प्रतिनिधी कोल्हापूर

### सत्कारणी लागतो दिवस

शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक जबाबदारीचा डोलारा... रोजच्या बैठका ...वेगवेगळे प्रशासकीय निर्णय सर्व अधिकारी, प्राध्यापक यांच्यासोबतचा संवाद हा खरेतर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा नित्यक्रम. मात्र करोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी लागू झालेल्या संचारबंदी काळात सध्या कुलगुरू डॉ. शिंदे आपल्या कुटुंबियांसमवेत आनंदाचे क्षण वेचत आहेत. तसेच व्हिडिओ कॉन्फरन्स तसेच ऑनलाइन यंत्रणेच्या माध्यमातून विद्यापीठाचे प्रशासकीय कामकाजही पूर्ण करत आहेत.

कुलगुरू डॉ. शिंदे यांचा दिवस नेहमीप्रमाणे सकाळी साडेपाच ते सहाला सुरू होतो. पण आता कार्यालयात वेळेवर पोहोचण्याची गडबड नसल्याने घरासमोरील अंगणात थोडासा व्यायाम करणे, बागेतल्या झाडांना पाणी घालून मग कुलगुरू शिंदे यांचा मोर्चा त्यांच्या स्वयंपाकघराकडे वळतो. सकाळच्या नाश्त्यासाठी ते पत्नी अनिता यांना मदत करतात. डॉ. शिंदे आणि त्यांच्या आई यांची खूप छान गट्टी आहे. सध्याच्या संचारबंदीमुळे मिळालेला वेळ ते आईसोबत गप्पा मारण्यासाठीही देतात. मुलगा शंतनु, मुलगी कैरवी यांच्यासाठी तर त्यांचे बाबा जीव की प्राण. आता सध्याच्या संचारबंदीच्या काळामध्ये मुलांसोबत खेळ खेळण्यातही कुलगुरू रमत आहेत. एकूणच सध्या कुटुंबियांसोबत मजेत वेळ देण्याबरोबरच पाककलेचा छंद जोपासणे, वाचन करणे, ऑनलाईन बैठका, चर्चा करणे असा दिनक्रम डॉ. शिंदे यांनी आखून घेतला आहे.

सध्या शिवाजी विद्यापीठाला १४ एप्रिलपर्यंत सुट्टी असल्यामुळे कुलगुरू शिंदे यांचे देखील काम वर्क फ्रॉम होम असे सुरू आहे. मात्र घरच्यांना वेळ देण्याबरोबरच विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजाचा आढावा ते रोज घेतात. विद्यापीठाच्या परीक्षांचे नियोजन वेळापत्रक कोलमडले आहे. त्यामुळे करोनाच्या पार्श्वभूमीवर परीक्षांबाबत काय निर्णय घ्यायचा, याबाबत सध्या त्यांच्या राज्यस्तरीय बैठका सुरू आहेत. योग्य त्या वेळी अधिकाऱ्यांना, प्रशासकीय कर्मचाऱ्यांना सूचना देण्याबरोबरच स्वतःचा देखील एक कामकाजाचा आढावा ठेवत आहेत. मिळालेल्या रिकाम्या वेळेत दुपारच्या आणि रात्रीच्या जेवणासाठी भाजी चिरून देणे हे काम डॉ. शिंदे यांनी आपल्या अधिकारात घेतले आहे. त्यानुसार जी भाजी करण्याचे नियोजन असेल ती भाजी चिरून, नीट करून देण्यात सध्या शिंदे यांचे हात व्यस्त आहेत. घरातल्या कामकाजाला मदत केल्यानंतर , कुटुंबीयांशी गप्पा मारल्यानंतर मात्र ते काहीवेळ आपल्या वाचनासाठी राखून ठेवत आहेत. डॉ.अप्पासाहेब पवार लिखित 'महाराणी ताराबाईकालीन कागदपत्रे' व 'जिजाबाईकालीन कागदपत्रे' या पुस्तकांचे वाचन सध्या ते करत आहेत. डॉ. शिंदे हे आंतरराष्ट्रीय जर्नल्स एडिटर बोर्डवर असल्याने त्यासंदर्भात संशोधनात्मक संदर्भांचे वाचन हा त्यांचा शिरस्ता आहे. सध्याच्या संचारबंदी काळातही त्यांनी आपल्या हा नियम अखंडित ठेवला आहे.

## कुलगुरूंचा वेळ कुटुंबीयांसोबतच वाचनाला

### मुलांसोबत विविध विषयांवर संवाद

फार्म इंडस्ट्रीमध्ये काम करत असलेला डॉ. शिंदे यांचा मुलगा शंतनू सध्या संचारबंदीमुळे घरी परत आला आहे. तर मुलगी कैरवी ही मुंबईमध्ये एम.टेक चे शिक्षण घेत आहे, तीदेखील सध्या घरी आली आहे. संध्याकाळी मुलांबरोबर वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करत त्यांचा संवाद सुरू आहे. एकूणच प्रशासकीय कामकाज बैठका आणि कुटुंबीयांसोबत गप्पा असा कुलगुरू डॉ. शिंदे यांचा संचारबंदी काळातील दिनक्रम अत्यंत आनंदात सुरू आहे.



# प्रशासनाच्या साथीला एनएसएसचे स्वयंसेवक

म. टा. प्रतिनिधी कोल्हापूर

करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शिवाजी विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील सुमारे २८ हजार स्वयंसेवक नागरिकांच्या सेवेसाठी व प्रशासनाच्या मदतीसाठी तत्पर आहेत. ही कामे करत असताना त्यांनी नागरिकांबरोबर स्वतःच्या आरोग्याची दक्षता घ्यावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले आहे.

डॉ. शिंदे यांनी प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, मानवनिर्मित तसेच नैसर्गिक संकट काळात शिवाजी विद्यापीठ पूर्ण क्षमतेने पुढाकार घेऊन त्या संकटावर मात करण्यासाठी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून काम करत असते. करोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता शिवाजी विद्यापीठाच्या वसतिगृहात १००० केंद्र तात्पुरत्या स्वरूपात सुरू केले जात आहे. सध्याच्या संकट काळात शिवाजी विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय छात्र सेना यांच्या स्वयंसेवक आणि स्वयंसेविका यांच्यावर करोना विरुद्धच्या लढाईत सहभागी होण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. सुमारे २८ हजार स्वयंसेवक फेसबुक, व्हाट्सअप या समाज माध्यमांचा वापर करत पन्नास लाखांहून अधिक लोकांपर्यंत पोहोचले आहेत. नागरिकांच्या कौटुंबिक अडचणींची माहिती घेऊन त्यांच्यापर्यंत मदत कार्य पोहोचवण्यात तसेच प्रशासनाच्या माध्यमातून मदत करण्यामध्ये स्वयंसेवक आपले योगदान देत आहेत. गरजू , फिरस्ते गावोगावचे असहाय्य ज्येष्ठ नागरिक, अनाथ, दिव्यांग इत्यादी लोकांच्या मदतीला धावून जात आहेत. लोकांना हातमोजे, मास्क याचे वितरण तसेच किराणा, भाजीपाला, औषधे व इतर जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यातही एनएसएस स्वयंसेवक काम करताहेत.

# SUK hostels ready with isolation ward, says Pro-VC

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has completed the renovation works at the girls and boys hostel at the Department of Technology (DoT) campus, as per the district administration's requirement, said D T Shirke, pro-vice chancellor of SUK.

"We have RO water plant in the university, so clean water is available on the campus. The 12 students who were in the DoT have been shifted in the other hostels. The three-phase electricity and the UPS connection has been set up to meet the guidelines of isolation ward," he said.

He said that the students' belongings have been labelled and shifted to secured places under surveillance.

All the other requirements asked by the administration authorities have complied.

He said that to complete the work suggested by the administrative officials, they had constituted 13 different committees to look after the basic necessities such as safety, health, communication, transportation, among others.

Rahul Gayakwad



A report of the district administration said that the ICUs and isolation wards with a total strength of 1,476 beds can be set up in various buildings on the university campus

Earlier the report of the district administration said that the ICUs and isolation wards with a total strength of 1,476 beds can be set up in various buildings on the university campus.

The arrangement was asked to be made in a way that one room will have only one bed.

The report had asked the university officials to repair the toilets, doors, windows of the buildings and set up facilities like clean drinking water and communication systems.

Meanwhile, Chhatrapati Pramila Raje (CPR) civil hospital has already been converted into Covid-19 hospital.

All the in-house patients have been moved to private hospitals and the OPD has been shifted to Seva hospital in Line Bazaar area.

# सहासदस्यीय समितीत कुलगुरू शिंदे

कोल्हापूर : करोना संसर्ग रोखण्यासाठी १६ मार्चपासून शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठ बंद आहे. दरम्यान, महाविद्यालय व विद्यापीठस्तरीय परीक्षा १५ मेपर्यंत स्थगित केल्या आहेत. एकूणच राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षांबाबत काय निर्णय घ्यायचा तसेच करोनाच्या पार्श्वभूमीवर या परीक्षा कधीपासून सुरू करायच्या याबाबत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सहा सदस्यीय राज्यस्तरीय समितीची स्थापना केली आहे. यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा समावेश करण्यात आला आहे.

# विद्यापीठात एक हजार बेडचा आयसोलेशन वॉर्ड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे (डिओटी) वसतिगृह जिल्हा प्रशासनास आयसोलेशन रुग्णालय म्हणून देण्यात येणार आहे. यानुसार शुक्रवारी मुलींच्या वसतिगृहातील सर्व साहित्य प्रशासनाने स्टोअर विभागामध्ये स्थलांतरित केले. लवकरच या ठिकाणी आयसोलेशन वॉर्ड उभारण्याचे काम सुरू करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील कोरोना रुग्णांची संख्या पाचवर पोहोचली असल्याने जिल्हा प्रशासन युद्धपातळीवर तयारी करत आहे. याचाच एक भाग म्हणून शिवाजी विद्यापीठातील वसतिगृहांमध्ये तात्पुरत्या स्वरुपाचे आयसोलेशन रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यास विद्यापीठानेही तयारी दर्शविली असून एक हजार बेड उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी दौलत देसाई व कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्यामध्ये चर्चा झाली होती. यानुसार तंत्रज्ञान विभागाचे वसतिगृह पहिल्या टप्प्यात प्रशासनास उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

**तंत्रज्ञान विभागाच्या वसतिगृहात सोय**

विद्यापीठाने आयसोलेशन रुग्णालयासाठी कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली आहे. या समितीच्या मार्गदर्शनाखाली सर्व कामकाज चालणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली. तसेच विद्यापीठातील अन्य वसतिगृहांचा आढावा घेण्याचे काम सुरु असून लवकरच अन्य वसतगृिहे प्रशासनास उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.



# टेस्टिंग लॅबसाठी विद्यापीठाची तयारी

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

करोनाच्या पार्श्वभूमीवर संशयित रुग्णांची तपासणी होऊन निदान व्हावे, यासाठी शिवाजी विद्यापीठाने करोना टेस्टींग लॅब उभारण्याबाबत तयारी दर्शवली आहे. याबाबत कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी तीन कोटी रुपयांचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे सादर केला आहे.

टेस्टींग लॅब उभारणीसाठी 'आयसीएमआर'ची मानके पूर्ण करण्यासाठी विविध घटकांची आवश्यकता आहे. यात टेस्टींग लॅब 'एनएबीएल'ची ॲक्रीडेटेड असणे महत्वाचे आहे. यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज आहे. जिल्हा प्रशासनाच्या परवानगीने हा प्रस्ताव आरोग्य विभाग, राज्य सरकारच्या परवानगीनंतर केंद्र सरकारकडे पाठविण्यात येणार आहे.